महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०७ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# चंद्रभागेच्या तिरी भक्तीचा महापूर
## लाखो भाविक आषाढी एकादशीसाठी पंढरीत दाखल



थोडक्यात महत्वाचे

## अनफिट बसमधून प्रवाशांचा प्रवास!

### ठाणे आगारातील घटना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील वंदना आगारातून कोल्हापूरला निघालेल्या शिवशाही बस गाडीच्या दुरावस्थेचा प्रकार समोर आला होता. या दुरावस्थेबाबत प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली होती. असे असतानाच आता या दुरावस्था झालेल्या ठाणे-कोल्हापूर बसचा तीन वर्षांपुर्वीच वाहन योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) संपुष्टात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच विमा (इन्शुरन्स) संपून चार वर्षापेक्षा अधिक कालावधी आणि पियूसी देखील नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. त्यामुळे शिवशाही बसमधील प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे चित्र आहे.

ठाण्यातील वंदना स्थानकातून पहाटे ५.१५ वाजता कोल्हापूरला जाण्यासाठी शिवशाही बस सोडण्यात येते. शुक्रवारी सकाळी ही बस पाऊण तास उशिराने सोडण्यात आली होती. त्यामुळे स्थानकात बसची वाट पहात ताटकळत उभे राहावे लागलेल्या प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली होती.

त्यानंतर स्थानकात आलेल्या शिवशाही बसमध्ये पाऊल ठेवताच त्यांना बसची अवस्था पाहून धक्का बसला होता. बसच्या चालकाला समोरील तुटलेली काच, नादुरुस्त आसन व्यवस्था, अस्वच्छता, फाटलेल्या सीट, उखडलेले पत्रे, असे चित्र प्रवाशांना दिसून आले. या बसच्या दुरावस्थेबाबत प्रवाशांनी चित्रीकरण केले आणि त्यानंतर ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांना फोनवरुन संपर्क साधत याबाबत माहिती दिली.

## भिवंडीत बोगस डॉक्टरांवर पालिकेची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वैद्यकीय कागदपत्रे नसतानाही एका डॉक्टरने भिवंडीत वैद्यकीय व्यवसाय थाटला होता. भिवंडी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई करुन संबंधित डॉक्टरविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

भिवंडीत यापूर्वी मोठ्याप्रमाणात बोगस डॉक्टर आढळून आले होते. त्यांच्याविरोधात महापालिकेकडून कारवाई झाली होती. दरम्यान, शहरातील बोगस डॉक्टरांविरोधात कारवाई करण्याच्या सूचना महापालिकेच्या आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी डॉ. जयवंत धुळे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी भिवंडीतील कामतघर भागात गेले असता, येथील एका गाळयामध्ये एक डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे आढळले. आरोग्य विभागाच्या पथकाने त्याच्याकडून सनदशीर कागदपत्रांची मागणी केली. परंतु तो डॉक्टर कागदपत्र दाखविण्यास असमर्थ ठरला.

संबंधित डॉक्टर अनधिकृतपणे वैद्यकीय व्यवसाय करत असल्याने पथकाने त्याच्याविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे डॉक्टरविरोधात वैदयकीय व्यवसायी अधिनियम १९६१ चे कलम ३३ आणि ३६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पांडुरंगाची शासकीय महापूजा
### यंदाचा आषाढी महापूजेचा मान नांदगाव तालुक्यातील उगले दाम्पत्याला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**सोलापूर :** आषाढी एकादशीच्या अनुपम्य सोहळ्याला सुरुवात झाली आहे. पंढरपुरातील चंद्रभागेच्या तीरावर लाखो वारकरी भक्तांच्या भक्तांचा महापूर आलेला दिसून येतो आहे. प्रत्येक भाविक हा मुखी विठ्ठल विठ्ठल नाव घेत चंद्रभागेच्या तीरावरवरून एकादशीच्या अनुपम्य सोहळ्यात सहभागी होत आहे. आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा पार पडली. फडणवीसांना सहाव्यांदा महापूजा करण्याचा मान मिळाला आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत त्यांची पत्नी अमृता फडणवीस आणि मुलगी दिव्यजा फडणवीस उपस्थित होते. यंदा आषाढी महापूजेचा मान कैलास दामू उगले (वय 52) आणि कल्पना कैलास उगले (वय 48) यांना मिळाला आहे. मूळचे नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्याचे असलेले उगले कुटुंबीय यांना मुख्यमंत्र्यांसोबत पूजेचा मान मिळाला आहे. कैलास उगले यांचे वडील माजी सैनिक होते. विठुमाऊलीची पूजा करण्याचा मान मिळाल्याबद्दल दाम्पत्याने आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, आम्हाला फार आनंद झाला आहे. या पुजेमुळे आमचा आनंद द्विगुणीत झाली आहे. आमचा आनंद शब्दात न मांडण्यासारखा आहे. या आधीपर्यंत वर्षातून एकदा पंढरीच्या वारीला येत होतो. आता एक वर्षाचा मोफत एसटी प्रवासाचा प्रवास मिळाल्यामुळे प्रत्येक महिन्याची पंढरीची वारी करेल.


## केडीएमसीचे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट
### शिक्षकांसाठी आता शिक्षण परिषद!


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महापालिका शाळांतील शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासह विद्यार्थ्यांचा स्तर वाढवण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागाने कंबर कसली असून त्याचाच एक भाग म्हणून महापालिका शाळांमधील शिक्षकांसाठी प्रथमच शिक्षण परिषदेचे आयोजन कल्याण मधील आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमदिरात करण्यात आले होते. या शिक्षण परिषदेला आयुक्त अभिनव गोयल यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करून त्यांच्याशी संवादही साधला. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सध्या निपुण भारत कार्यक्रम राबवला जात आहे, ज्यामध्ये महापालिका शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांचा पायाभूत बौध्दीक स्तर वाढवण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याअंतर्गत काही दिवसांपूर्वी महापालिका शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची विनोबा भावे ॲपच्या माध्यमातून मराठी - इंग्रजी आणि गणित विषयाची चाचणी घेण्यात आली आहे. त्याद्वारे महापालिका शाळांतील विद्यार्थी कोणत्या स्तरावर आहेत ते निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर पुढील ३ महिन्यांमध्ये महापालिका शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला निपुण करून अंतिम टप्प्यापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या प्रारंभिक चाचणीमध्ये समोर आलेल्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर शिक्षकांना माहिती करून देणे, आवश्यक ते नियोजन करणे आणि ३ महिन्यात महापालिका शाळांतील हे सर्व विद्यार्थी अंतिम टप्प्यापर्यंत कसे पोहोचतील याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ही पहिली शिक्षण परिषद आयोजित करण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली. ज्यामध्ये महापालिका शाळांचे सर्व शिक्षक, सनियंत्रण अधिकारी, मार्गदर्शन करण्यासाठी काही शिक्षण अभ्यासकही सहभागी झाले होते.

## कल्याण तालुक्यात वन विभागाच्या हद्दीत हजारो झाडांची तोड
### प्रोजेक्टच्या नावाखाली तोडलेली झाडे गेली कुठे?





> कल्याण तालुका वन विभागाच्या दुटप्पी धोरणामुळे चोरटी वृक्ष तोड वाढत आहे.
> कुंपणच शेत खाते आहे.
> - सुधीर भोईर
> सदस्य पर्यावरण प्रेमी संघटना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील वन विभागाचा भोंगळ कारभार गेली तीन वर्ष तसाच सुरु आहे. येथील वन्य कर्मचाऱ्यांच्या भ्रष्ट कामगिरीमुळे तालुक्यातील वन जमीनीवरील मोठं मोठ्या जुनाट वृक्षाची तोड करण्यात आली आहे. सरकारी प्रोजेक्त च्या नावाखाली काही झाडे तोडली गेली, ही तोडलेली झाडे गेली कुठे? ही झाडे ही गायब झाली की परस्पर विकली गेली? असा प्रश्न पर्यावरण प्रेमीचा आहे.

तालुक्यातील सहा हजाराहून अधिक असणाऱ्या वन जमिनीवर वन कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने राजरोस अतिक्रमन होतं आहे. त्या कडे दुर्लक्ष करत उलट या अतिक्रमनातही आपले उखळ पांढरे करून घेत कर्मचारी आपला स्वार्थ साधत आहेत. त्याचा फटका वन संपत्तीला बसतो आहे. मात्र त्या बाबत ही देणे घेणे नसल्याने फक्त असणाऱ्या वनाची लूट कशी होईल हीच मानसिकता असणारे वन कर्मचारी फक्त दिखाऊ काम करत आपला स्वार्थ साधत आहेत.

वन जमिनीवरील हजारो झाडे तोडली गेली, त्या मोबदल्यात तितकीच झाडे लावणे आवश्यक असताना, तालुका वन विभागाच्या भोंगळ, मनमानी कारभारामुळे वन विभागाच्या जमिनीवरील झाडे बेसुमार तोडली गेली आहेत. या वृक्षात कल्याण मुरबाड रस्त्यावरील शंभर वर्ष जुनी असणारी वड पीपळ सारखी मोठ मोठी झाडे दिवसा व कधी रात्री चोरून तोडली गेली या झाडा चे मोठं मोठे सांगाडे गायब केले गेले आहेत.

कल्याण तालुका वन विभाग कार्यालयातील कर्मचारयाच्या हलगर्जीपणामुळेच तालुक्यातील वन जमीन बिल्डराच्या घशात जात आहे. वनजमीन घटत आहे. त्याच वेगात बेसुमार वृक्ष तोडीमुळे वन संपत्ती कमी होतं आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत
## आषाढी एकादशीनिमित्त बिर्ला महाविद्यालयात ज्ञानदिंडी







दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** निसर्ग संवर्धन आणि स्वच्छतेची जाणीव असलेल्या श्री विठोबा-रुक्मिणीच्या भक्तीवर आधारित ज्ञान दिंडी रविवारी सकाळी काढण्यात आली होती. निमित्त होते ते आषाढी एकादशी चे.

कल्याण चॅरिटेबल ट्रस्ट, सेंच्युरी रेयान, बी.के. बिर्ला महाविद्यालय, बी.के. बिर्ला नाईट कॉलेज, बी.के. बिर्ला पब्लिक स्कूल आणि सेंच्युरी रेयान हायस्कूल यांनी आषाढी एकादशी निमित्त भव्य ज्ञान दिंडीचे आयोजन केले होते. ही यात्रा कल्याण येथील बिर्ला महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरु होऊन शहाड येथील विठ्ठल मंदिरात तिचा समारोप झाला. या ज्ञानदिंडीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुरूवात झाली. त्यांनी विठ्ठल भक्तांना संबोधित करताना सांगितले, उपमुख्यमंत्र्यांनी संत ज्ञानेश्वर आणि वारकरी संप्रदायाचे महत्त्व सांगितले. पर्यावरण संवर्धनावर लक्ष केंद्रित करून आयोजित केलेल्या या ज्ञान दिंडीला ज्ञानेश्वरांच्या परंपरेशी जोडत त्यांनी महाविद्यालय परिवाराचे कौतुक केले.

या यात्रेत रथावर विराजमान विठ्ठल आणि रुक्मिणीने सजवलेला रथ, पालखी, ढोलकी, लेझीम पथक आणि झांज पथक, वारकरी भजनी मंडळ विद्यार्थी या ज्ञान दिंडीत सहभागी झाले होते अशा भक्तिमय वातावरणात ज्ञानदिंडी आयोजन करण्यात आले होते. भजन मंडळी वारकरी विठ्ठल अभंगाच्या तालावर भक्तिमय वातावरणात नाचत होते. या ज्ञानदिंडीत जवळपासच्या शैक्षणिक संस्था आणि सामाजिक कल्याणकारी संस्थांमधील हजारो वारकरी भाविक सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ओ.आर. चितलांगे यांच्या मार्गदर्शनाखाली २०१६ पासून ही ज्ञान दिंडी यात्रा आयोजित केली जात आहे. शहाड येथील विठ्ठल मंदिरात भगवान विठ्ठलाची आरती आणि प्रसाद वाटपाने या या ज्ञानदिंडीचा समारोप झाला.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार विश्वनाथ भोईर, कुमार आयलानी, सुलभा गायकवाड, नरेंद्र पवार, प्रकाश भोईर, प्रमोद हिंदूराव, महाविद्यालयीन शिक्षण संचालक डॉ. नरेश चंद्र, प्राचार्य डॉ. अविनाश पाटील, डॉ. हरीश दुबे, सुबोध दवे आणि सेंच्युरी रेयॉन युनिटचे प्रमुख दिग्विजय पांडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ओ. आर. चितलांगे यांनी उपमुख्यमंत्र्यांना रुक्मिणी-विठोबाची मूर्ती, शाल, नारळ आणि तुळशीचे रोप देऊन सन्मानित केले.

## वाचक मनोगत

### शहरांच्या बकालपणाला प्रशासकीय घटकच कारणीभूत

मुंबई शहरालगतच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर, पालघर, भिवंडी, नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरालाही अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे या समस्येचा भस्मासूर निर्माण झाला असून बकालपणाचाही उद्रेक झाला आहे. मुळातच ज्या-ज्या वेळी प्रशासनाकडून समस्यांकडे कानाडोळा केला जातो, अतिक्रमणाला खतपाणी घातले जाते, त्या-त्या वेळी शहराला बकालपणाचा विळखा बसण्यास फारसा वेळ लागत नाही. अतिक्रमणाला, बकालपणाला त्या-त्या भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन जबाबदार असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयानेही नोंदविले आहे. ठाण्यातील अतिक्रमणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्याने अतिक्रमणाच्या समस्येचे गांभीर्य उघडकीस आले. ठाण्यातील १७ बेकायदा बांधकामांवरील कारवाईत दिरंगाई केल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्तांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली, तर बेकायदा बांधकामांच्या पाडकाम कारवाईसाठी येणाऱ्या खर्चांपैकी १० टक्के रक्कम या बांधकामांसाठी जबाबदार असलेल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याचा विचार करा, अशी सूचना उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिकेला केली. याशिवाय, बेकायदा बांधकामांवर कारवाई न करण्यासाठी जबाबदार असल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक आयुक्त फारूख शेख यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आल्यावर त्यांना निलंबित करण्यात आल्याचेही महापालिकेच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. याव्यतिरिक्त आणखी तीन सहाय्यक आयुक्त, तीन बीट मुकादम आणि एका बीट निरीक्षकालाही 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आल्याचे न्यायालयाला सांगितले गेले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने ठाणे महापालिकेतर्फे राबवण्यात येणाऱ्या मोहिमेचे कौतुक केले. तसेच, बेकायदा बांधकामांबाबतचा ठाणे पॅटर्न राज्यभरात राबवण्याचे मत पुन्हा एकदा व्यक्त केले.

बेकायदा बांधकामे तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहतात आणि महापालिकेकडून त्यांना नोटिसा बजावण्याशिवाय कोणतीही कारवाई केली जात नाही. ही स्थिती अशीच राहिली, तर ठाण्यात अराजकतेची स्थिती निर्माण होईल, अशा शब्दांत बेकायदा बांधकामांवरील कारवाईतील निष्क्रियतेवरून न्यायालयाने मागील सलग दोन सुनावणीच्या वेळी फटकारले होते. त्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने बेकायदा बांधकामांवरील आणि या कारवाईत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरील कारवाईची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाला दिली. मुळात सरकारी जागेवर ज्या वेळी मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या निर्माण होत असतात, व्यापक स्वरूपात चाळी उभारल्या जातात. त्या चाळी, झोपडपट्ट्या एका दिवसामध्ये निर्माण होत नाहीत, त्यासाठी काही दिवसांचा कालावधी जात असतो. चाळी, झोपडपट्ट्यांची कामे सुरू असताना महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने वेळोवेळी कारवाईचा हातोडा उगारला असता, तर सरकारी जमिनीवर, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणालाही मर्यादा पडल्या असत्या. शहरांच्या बकालपणाला केवळ राजकीय घटक जबाबदार नसतात, तर पूर्णपणे प्रशासकीय घटकच कारणीभूत असतात.

**वसंत पाटील**

# सर्वसामान्य जीवन अन् ; मिळाला निरपेक्ष भगवंत
## नांदगाव तालुक्यातील शेतकरी दाम्पत्याला विठ्ठलाच्या श्री पूजेचा मान



आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथील श्रीविठ्ठल मंदिरात देशभरातील सर्व वारकरी बांधवांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमृता फडणवीस यांच्या हस्ते केल्या जाणाऱ्या शासकीय महापूजेसाठी वारकरी संप्रदायातील मानाचा असणारा बहुमान नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील भूमिपुत्र तथा वारकरी कैलास दामु उगले व कल्पना कैलास उगले यांना मिळाल्याने गावासह तालुका परिसरात आनंद व्यक्त केला जात आहे.

आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी लाखो भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल झालेले असताना नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील घाटमाथ्यावरील जातेगाव येथील कैलास दामु उगले व व त्यांच्या पत्नी कल्पना कैलास उगले यांना वारकरी संप्रदायाशी असलेली निष्ठा व भक्तीभावाने वारकरी संप्रदायात मानाचे स्थान मिळाले आहे. जातेगाव येथील कैलास दामु उगले हे एक सर्वसामान्य शेतकरी असून ते गेल्या १३ ते १४ वर्षांपासून पंढरपूरची वारी करत आले आहेत. भक्ती व निरपेक्ष सेवाभावामुळेच वारकरी संप्रदायात मानाचे वारकरी म्हणून मंदिर समितीकडून त्यांची निवड करण्यात आली. दरम्यान, उगले दाम्पत्याला यंदाच्या शासकीय महापूजेचा मान मिळाल्याने गावासह नाशिक जिल्ह्याच्या गौरवाचा हा आध्यात्मिक क्षण ठरला आहे. कारण शासकीय महापूजेमध्ये थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सहभागी होण्याची संधी उगले कुटुंबाला मिळाली आहे. याप्रसंगी उगले दाम्पत्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच राज्य परिवहन महामंडळाकडून वर्षभर मोफत प्रवासासाठी पास प्रदान करण्यात आला आणि मंदिर समितीकडूनही विशेष सन्मानित करण्यात आले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा फडणवीस यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील वारकऱ्यांसाठी आषाढी एकादशी हा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी शासकीय पूजेचा मान मिळणे ही प्रत्येक वारकऱ्याची स्वप्नवत बाब मानली जाते. यंदा हा मान मिळाल्याने उगले दाम्पत्य आनंदाने भारावले आहे. 'काय बोलावं, काहीच समजत नाही. खूप आनंद झाला आहे. आमचा नंबर लागेल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं, अशी भावना कैलास उगले यांनी व्यक्त केली.' तर, "फडणवीस साहेबांसोबत विठ्ठलाचं दर्शन आणि पूजा करण्याची संधी मिळेल, असं कधीच वाटलं नव्हतं. मी भगवंतासमोर आहे, हीच खूप मोठी गोष्ट आहे," असे म्हणत कल्पना उगले यांनी आपला आनंद व्यक्त केला.

सर्वसामान्य शेतकरी असूनही वारकरी संप्रदाय परंपरेला वाहून घेतलेल्या उगले दाम्पत्याने संपूर्ण महाराष्ट्रासाठी भक्तीच्या वाटचालीस प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. ग्रामीण भागात साधे जीवन जगत असतानाही, त्यांच्या निष्ठेने त्यांना विठूरायाच्या सान्निध्यात निरपेक्ष भक्तीमुळे हा सन्मान मिळाल्याने जिल्ह्यासह राज्यभरात उगले दाम्पत्याचे कौतुक केले जात आहे. उगले दाम्पत्य हे शासकीय महापूजेचा मान मिळालेले नाशिक जिल्ह्यातील तिसरे कुटुंबीय ठरले आहे.

■■■

**नाशिक जिल्ह्यातील दुर्मिळ भागातील आम्ही सर्वसामान्य शेतकरी असून, आम्हा दोघांना मिळालेला हा मान जणू नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण वारकऱ्यांना लाभलेला सन्मान आहे. पांडुरंगाची श्रद्धा आणि निरपेक्ष सेवा कधी वाया जात नाही. पांडुरंगाच्या चरणी सेवा आणि सन्मान मिळण्याचा हा क्षण अविस्मरणीय असून, जीवन सार्थ झाले आहे.**

**कैलास दामू उगले,**
**आषाढी एकादशीचे मानाचे वारकरी**

# आ. किसन कथोरे यांच्या उपस्थितीत म्हारळ ग्रामपंचायत सदस्य किशोर वाडेकर यांचा भाजपात प्रवेश!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : म्हारळ ग्रामपंचायतीचे सदस्य आणि नुकत्याच झालेल्या कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदाच्या निवडणुकीत निवडून आलेल्या म्हारळ येथील किशोर गोंविंद वाडेकर यांनी कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.म्हारळ ग्रामपंचायतीचे सदस्य असलेले किशोर वाडेकर हे ग्रामपंचायत अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघात तून कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत उतरले होते, त्यांनी अखेरच्या क्षणी भाजपाचे आमदार किसन कथोरे यांचा आशीर्वाद घेतला, व संचालक म्हणून निवडूनही आले, यामुळे त्यांच्या कार्यालयात जाऊन आमदार कथोरे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. हे सर्व घडवून आणण्यासाठी म्हारळ ग्रामपंचायतीचे माझी सरपंच, मंडळ अध्यक्ष योगेश देशमुख, माझी सरपंच प्रमोद देशमुख, यांनी विशेष प्रयत्न केले.या प्रवेशावेळी संचालक रवींद्र घोंडविंदे, माझी सरपंच योगेश देशमुख,माझी उपसभापती पांडुरंग म्हात्रे, म्हारळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोंगिरे, सदस्य विकास पवार, समाजसेवक महेश देशमुख, जिंतेद्र देशमुख, सचिन वाडेकर, सुरेश देशमुख,बाळकृष्ण देशमुख, केतन देशमुख, आणि रुपेश भोपी इत्यादी उपस्थित होते.यामुळे म्हारळ परिसरात भाजपाची ताकत वाढत असल्याचे दिसून येत आहे.



कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पदी निवड झालेले रवींद्र घोडविंदे सर (संस्थापक अध्यक्ष जीवनदीप कॉलेज गोवेली) यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना निवड झाल्या बद्दल समता सामाजिक फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य व दैनिक आधुनिक केसरीच्या वतीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ठाणे जिल्हा अध्यक्ष शंकर करडे यांनी शुभेच्छा दिल्या.

# आषाढी एकादशीनिमित्ताने कांबा-पाचवामैल येथील श्री सिध्देश्वर मंदिरात भक्तांची मांदियाळी!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
(बातमीदार)

**कल्याण** : पाऊले चालती पंढरींची वाट, असे म्हणत लाखो भाविक पंढरीच्या दिशेने वाटचाल करतात, पण प्रत्येकाला पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही, त्यामुळे ते कल्याण तालुक्यातील कांबा-पाचवामैल येथील श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिरात सावळ्या विठोबा रखुमाई ला भेटण्यासाठी, दर्शनासाठी येत असतात. उल्हास नदीच्या काठावर कांबा-पाचवामैल येथे श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिर आहे.



कल्याण ग्रामीण परिसरात हे प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जातेत्यामुळे आषाढी एकादशीला ज्यांना पंढरपूरला जाता येत नाही ते सर्व कल्याण ग्रामीण भागाचे प्रतिपंढरपूर म्हणून ओळख निर्माण झालेल्या पाचवा मैल येथे दर्शनासाठी येतात,आज आषाढी एकादशी असल्याकारणाने सकाळपासूनच दर्शनासाठी रांग लागलेली होती, यामध्ये प्रसिध्द उद्योजक मोहन शेठ (बाबा) कांबा, अनिल शेठ शेलार, राकेश शेठ मोरे, ग्रामपंचायतीचे सदस्य संदिप पावशे, उद्योजक व माझी सदस्य मधुकर सिरोशे, पत्रकार संजय कांबळे यांच्यासकांबा, वरप, म्हारळ, पावशे पाडा, पाचवा मैल, उल्हासनगर, वाघेरापाडा, रायते, आदी परिसरातील भक्त दर्शनासाठी येत होते यावेळी मधुकर सिरोसे यांच्यातर्फे आषाढी उपवास नाष्टा ची सोय करण्यात आली होती.मंदिर परिसरात पोलिस बंदोबस्त होता.

# निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रास आ. राजेश मोरे यांची भेट

## दत्तक घेतलेल्या ऐंशी रुग्णांना पोषण आहार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : देशात पंतप्रधान नेतृत्वाखाली टीबी मुक्त भारत हे अभियान पूर्ण देश भर राभवण्यात येत आहे. २०२५ चे आखिरेच क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे लक्ष्य आहे. ह्या अभियाना अंतर्गत शासनाकडून विविध उपायोजना राबवल्या जातात व त्यातील निक्षय पोषण आहार ही प्रमुख योजना राबवली जाते.

ह्या योजनेअंतर्गत आज कल्याण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे येथील ८० रुग्णांना आमदार सहा महिन्याचे पोषण आहार वाटप करण्यात येणार आहे. ह्या उपक्रमामुळे क्षय रुग्णांना चांगल्या औषध उपचारा सोबत सकस आहार सुद्धा मिळणार आहे.यासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ पूनम जयकर यांनी विशेष प्रयत्न केले होते. क्षयरुग्णांना उपचारावेळी पोषण आहार मिळाला नाही तर उपचाराचे सकारात्मक परिणाम दिसत नाही त्यामुळे क्षय रुग्णांना पोषण आहार देण्यासाठी राबवलेल्या निक्षय मित्र उपक्रमांतर्गत कल्याण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे येथे आमदार राजेश मोरे यांनी 'निक्षय मित्र, म्हणून कार्यक्षेत्रातील ८० क्षयरुग्णांना निक्षय पोषणआहार वाटप केला आहे क्षयरुग्णांसाठी बनवलेल्या फूड बास्केटमध्ये तांदूळ, डाळी, मटकी, खाद्यतेल, शेंगदाणे याचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी आमदार श्री मोरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास पत्र्याचे शेड दिल्याबद्दल त्यांचे डॉ जयकर यांनी आभार मानले.यावेळी बोलताना आमदार राजेश मोरे म्हणाले, निळजे प्राथमिक आरोग्य केंद्र हे उपजिल्हा रुग्णालय झाले तर अधिक लोकांना आरोग्य सेवा देता येईल, याचा प्रस्ताव पाठवा तो मंजुरीसाठी प्रयत्न करतो असे सांगून टिबी आटोक्यात यायला हवे असे बोलून जर पेशंट वाढले तरी त्यांना सर्वांना सामावून घेतले जाईल असे बोलून सर्वांना पोषण आहार कायमस्वरूपी मिळेल असे ही त्यांनी सांगितले.



यावेळी त्यांच्या सोबत त्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी कार्यक्रमासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ,पूनम जयकर मॅडम,जिल्हा क्षयरोग कार्यालय मधून डॉ,चारुलता धानके विस्तार अधिकारी मोहन गायकवाड, निळजे पीएससीचे डॉ गोविंद उपाध्याय, समुदाय आरोग्य अधिकारी अक्शेना कोरे,धनंजय भदाणे,कैलास घरत, पूजा चव्हाण, विनोद पवार, माने, चौधरी,प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी , सामुदाय आरोग्य अधिकारी , आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक ,आरोग्य सेविका ,औषध निर्माण अधिकारी, वैज्ञानिक प्रयोगशाळा अधिकारी तसेच गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका उपस्थित होते

# ठाण्यात मोफत दाखले वाटप शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

इ.10 वी व 12 वीच्या निकालानंतर अकरावी, पदवी व आयटीआयच्या प्रवेशाकरिता अनेक प्रकारच्या शासकीय दाखल्यांची आवश्यकता असते. यासाठी अनेक वेळा विद्यार्थी, पालकांची दमछाक तसेच पिळवणूक होते. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी ठामपा माजी नगरसेवक अमित सरैया यांचे मार्गदर्शनाखाली न्यू क्रांती मित्र मंडळाचे वतीने श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे रविवार दिनांक 06 जुलै 2025 सकाळी 11 ते 4 या वेळेत भव्य मोफत विविध शैक्षणिक दाखले वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये आयुष्यमान भारत कार्ड, मतदार नोंदणी व दुरुस्ती, डोमिसाईल सर्टिफिकेट, ई -श्रम कार्ड, जेष्ठ नागरिक दाखला अशा विविध दाखल्याचे मोफत वितरण करण्यात आले. याचा लाभ परिसरातील अनेक विद्यार्थी आणि पालकांनी घेतला. शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर, रामसेनाचे सुनिल सिंह, गौरव मिश्रा, धर्मेंद्र गुप्ता, रोहित तिवारी, विजय अहिरे, सुशील सिंह व नागराज देवर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्याम केदार यांना रसायनशास्त्रात पीएचडी

### रसायनशास्त्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे पहिले मुरबाडकर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

IIT Bombay येथे कार्यरत असलेले फांगणे गांवचे रहिवाशी श्री. श्याम सुनंदा दत्तात्रय केदार यांनी ०३/०७/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठ यांच्याकडुन रसायनशास्र या विषयात Ph. D. पदवी संपादन केली. विश्लेषक रसायनशास्त्रात (Analytical Chemitry) Ph. D. करणारे ते पहिले मुरबाडकर आहेत. कुणबी समाज सेवा संघ तर्फे मनःपूर्वक अभिनंदन

# भादाणे येथील जेष्ठ नागरीक इंद्रजित जाधव यांचे निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**राजेश दळवी**

**पडघा:** भिवंडी तालुक्यातील भादाणे येथील जेष्ठ नागरीक इंद्रजित जाधव यांचे अचानक दुःखद निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सर्वांनां सुपरिचीत व भादाणे गावचे भुमीपुत्र असलेले इंद्रजित सावळाराम जाधव (६५) हे सार्वजनिक बांधकाम विभागातून सेवानिवृत्त झाले होते. शांत स्वभाव ,मितभाषी व सर्वांशी मिळुन मिसळुन वागणारे जाधव यांचा अल्पशा आजाराने भादाणे येथील राहत्या घरी निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी तिन मुले एक विवाहित मुलगी असा मोठा परिवार असुन सामाजिक कार्यकर्ते व आई एकवीरा सुशिक्षीत बेरोजगार सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण जाधव व युवा सामाजिक कार्यकर्ते राकेश जाधव यांचे ते वडील होते त्यांच्या अंत्ययात्रेवेळी विविध क्षेत्रातील नागरिकांसह आप्तेष्ट, नातेवाईक व मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचा दशक्रिया विधी १२ जुलै रोजी श्री क्षेत्र खडवली येथे तर उत्तरकार्य १५ रोजी जुलै भादाणे येथे होणार आहे.





**सोमवार**
**०७ जुलै २०२५**

**मेष**
विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे.आज तुमच्या घरी लहान पाहुणे येण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
संपत्तीत वाढ होईल. आज तुमच्या दिवसाची सुरुवात चांगल्या मूडने होणार आहे.

**मिथुन**
व्यवसाय करणाऱ्या लोकांचा व्यवसाय चांगला होईल. तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला

**कर्क**
तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला आहे. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**सिंह**
काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**कन्या**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. घर खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी दिवस शुभ

**तूळ**
नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घ्याल. आज तुमचा दिवस आनंदाने भरलेला जाणार आहे.

**वृश्चिक**
तुमचे मित्र तुम्हाला मदतीसाठी विचारतील, तुम्ही त्यांना निराश करणार नाही.

**धनु**
व्यवसाय करणाऱ्या लोकांना चांगला नफा मिळेल. आज तुम्ही महत्त्वाच्या बैठकीला जाल.

**मकर**
वडिलांचा सल्ला तुम्हाला तुमच्या व्यवसायात मदत करेल. गरजू व्यक्तीला मदत कराल.

**कुम्भ**
महिलांसाठी दिवस उत्तम राहील. व्यावसायिक महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात.

**मीन**
आज तुमचा दिवस संमिश्र जाईल. एकाग्र चित्ताने केलेले काम फायदेशीर ठरेल.

## ७ जुलै दिनविशेष

१९१० : पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना.
१९४१ : दुसरे महायुद्ध – अमेरिकन सैन्याचे आइसलँडआगमन
१९४८ : चित्रपट अभिनेत्री पद्मा चव्हाण यांचा जन्म.
१९७३ : भारतीय गायक-गीतकार आणि दिग्दर्शक कैलाश खेर यांचा जन्म.
१९८१ : क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांचा जन्म

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# शहापूर तालुक्यात पारंपरिक, पट्टा व यांत्रिक भात लागवडीचे प्रात्यक्षिक



## मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शेतकऱ्यांसमवेत केली भात लावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर दि. ०६** - तालुका शहापूर येथील मौजे अल्याणी व गेगाव या गावांमध्ये दि. ५ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषद ठाणे व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीसंदर्भातील उपक्रम राबविण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा कृषी अधीक्षक रामेश्वर पाचे, कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर, तसेच गटविकास अधिकारी, तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच शेतकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमांतर्गत मौजे अल्याणी येथे पट्टा पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक करण्यात आले, तर मौजे गेगाव येथे मशीनद्वारे भात लागवडीचे प्रात्यक्षिक राबविण्यात आले. दोन्ही ठिकाणी शेतकऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती दिसून आली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घुगे यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधत पारंपरिक भात लागवडीच्या तुलनेत पट्टा पद्धत व यांत्रिकी पद्धतीने लागवड केल्यास होणारा खर्च, मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळ समजावून सांगितला. शाश्वत शेतीसाठी आधुनिक पद्धतींचा अवलंब का आवश्यक आहे, हे त्यांनी वास्तववादी उदाहरणांसह स्पष्ट केले.

यानंतर जिपसेस योजनेअंतर्गत DBT (Direct Benefit Transfer) द्वारे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या कृषी साहित्याची पाहणी करण्यात आली. संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्या साहित्याचा योग्य वापर कसा करावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले.

तसेच, शेतकऱ्यांनी भविष्यात तूर लागवडीचे क्षेत्र वाढवावे, यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यासोबतच भात व भाजीपाला उत्पादनानंतर त्याच्या विपणनासाठी शेतकरी गट कंपनी स्थापनेचे महत्त्व सांगण्यात आले. ही कंपनी शेतमालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा कसा करून देऊ शकते, याबाबत शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले.

या उपक्रमामध्ये महिला बचत गटांनाही विशेष महत्त्व देण्यात आले असून जिल्हा परिषद तर्फे त्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल, असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते मग्रारोहयो योजनेअंतर्गत बांबू वृक्ष लागवड व आंबा वृक्ष लागवड देखील करण्यात आली.

कार्यक्रमास अल्याणी व गेगाव येथील सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ, तालुका स्तरावरील कृषी अधिकारी विलास झुजारराव, कृषी विस्तार अधिकारी सचिन गंगावणे, दिनेश घोलप, ललित बडगुजर, तसेच ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

हा उपक्रम शेतकऱ्यांच्या शेतीतील प्रगतीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून जिल्हा परिषद ठाणे व कृषी विभाग यांचे सहकार्य यापुढेही कायम राहणार आहे.

# भारंगी नदीत बुडालेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** आसनगाव येथील भारंगी नदीत बुडालेल्या सार्थक कोळी या तरुणाचा मृतदेह चार दिवसांनी शोध मोहीम पथकाला सापडला. तर, शहापूर येथील भारंगी नदीत शुक्रवारी बुडालेल्या ९० वर्षीय वृद्धाचा शोध अद्याप सुरु असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आली.

कल्याण येथील सार्थक कोळी (१७) हा बुधवारी डिप्लोमाच्या दुसऱ्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी जोंधळे महाविद्यालयात आला होता. परंतु, प्रवेश प्रक्रियेसाठी अवधी असल्याने आसनगाव येथील भारंगी नदीत मित्रांसह पोहायला गेला होता. पाण्याचा अंदाज आला नसल्यामुळे सार्थक पाण्यात बुडाला. तर, शुक्रवारी शहापुर जवळून वाहणाऱ्या भारंगी नदीत कळंभे येथील दत्तात्रय रोकडे (९०) वृद्ध बुडाले. त्याच दरम्यान, माहुली किल्याच्या पायथ्याशी असलेल्या धबधब्याखाली असलेल्या डोहातील पाण्याचा अंदाज आला नसल्यामुळे सॅमराज राधा (२१) या तरुणाचा बुडून मृत्यू झाला होता. त्याचा मृतदेह स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढण्यात आला. परंतू, सार्थक आणि दत्तात्रय यांच्या मृतदेहाचा शोध सुरु होता. सार्थकचा मृतदेह शनिवारी म्हणजेच चार दिवसांनी सापडला.

तर, दत्तात्रय रोकडे यांचा शोध अद्याप सुरु असल्याचे शहापुर पोलिसांनी सांगितले. या तीन घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



# देसाई-काटई पुलाच्या उद्घाटनाचा फज्जा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शरद शहाणे

**डोंबिवली :** देसाई ते काटई दरम्यान वाहतूक सुलभ व्हावी म्हणून नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन घाईघाईत करण्यात आले. मात्र, उद्घाटनाचे काही क्षणांतच हा पूल अपघाताचा केंद्रबिंदू ठरला. पूल पूर्णपणे तयार न झाल्याने उद्घाटनानंतर काहीच वेळात अनेक मोटारसायकली घसरून पडल्या. काही नागरिकांना किरकोळ दुखापत झाली, तर काहींनी स्वतःहून सावरून पुढे वाटचाल केली.घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने पूल वाहतुकीसाठी बंद केला.

सध्या पुलावर बारीक खडी टाकण्याचे काम सुरू असून, सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित केली जात आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.घटनेनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) च्या कार्यकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. या गटाचे स्थानिक नेते दीपेश म्हात्रे यांनी ज्या व्यक्तींनी उद्घाटन केले आणि नारळ फोडला त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, जर गुन्हा दाखल झाला नाही तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, प्रशासन आणि राजकीय प्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

# पनवेल तालुक्यात एक लाखाहून अधिक शिधापत्रिकांची ई-केवायसी रखडली ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. ६ (बातमीदार)**

राज्य सरकारने शिधापत्रिकाधारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक केली असतानाही तालुक्यातील जवळपास एक लाख सात हजार ५५८ लाभार्थी अद्याप नोंदणीपासून वंचित आहेत. ३० जूनला ई-केवायसीसाठी दिलेली अंतिम मुदत संपुष्टात आली. आता सरकारने ई-केवायसी न झालेल्यांची सविस्तर माहिती मागवली आहे. १० जुलैपर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश पुरवठा विभागाला दिले आहेत. त्यामुळे लाखाच्या वर लाभार्थी शिधा पुरवठ्यापासून वंचित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वारंवार मुदतवाढ देऊनही ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यास धान्य पुरवठा बंद केला जाऊ शकतो आणि त्यास सर्वस्वी शिधापत्रिकाधारकच जबाबदार राहतील. यासोबतच अशा लाभार्थ्यांची नावे शिधा वितरण केंद्रांमध्ये प्रसिद्ध केली जाणार असून, नागरिकांना वेळेत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन पनवेल तालुका पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांनी केले आहे.

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यास अवघे चार दिवस शिल्लक आहेत. अंतिम टप्प्यात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांनी वेळेआधी ई-केवायसी करून शिधा पुरवठा नियमित राहील, याची दक्षता घ्यावी, असे आवाहनही धनवे यांनी केले आहे.

ई-केवायसीसंदर्भात १० जुलैपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्यात येईल. या अहवालानंतर ज्या शिधापत्रिकाधारकांनी केवायसी केलेले नाही, त्यांचे धान्य बंद होण्याची शक्यता आहे. ज्या शिधापत्रिकाधारकांचे अंगठे पॉस मशीनवर उमटत नाही व तांत्रिक अडचणी येत आहेत, तशांची यादी वेगळी ठेवण्याच्या सूचना दुकानदारांना देण्यात आल्या आहेत. तसेच वयोवृद्ध व लहान मुलांचे अंगठे उमटत नसल्यास त्यांची यादी सरकारला पाठवण्याचे निर्देश दिले आहेत. ई-केवायसीसाठी जवळच्या अधिकृत केंद्रावर आधार कार्डसह भेट देणे आवश्यक आहे तर काही ठिकाणी ऑनलाइन पर्यायही उपलब्ध आहे. राज्य सरकारचा उद्देश शिधापत्रिका व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्यासोबतच बनावट लाभार्थ्यांवर नियंत्रण मिळवण्याचा आहे. यामुळे खऱ्या गरजूंपर्यंत अन्नधान्याचा लाभ नीट पोहोचू शकेल, असे सरकारचे म्हणणे आहे.

### 'आधार'चाच अडथळा

ई-केवायसी प्रक्रियेमध्ये आधार कार्ड लिंक न होणे, अंगठा न ओळखणे, मशीनने ठसे न उमटणे, अशी तांत्रिक कारणे अडथळा ठरत आहेत. ग्रामीण भागात साक्षरतेचा अभाव, तांत्रिक त्रुटी आणि मार्गदर्शनाचा अभाव ही कारणे आहेत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काही लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकात चूक आहे. अनेक वृद्धांचे ठसे उमटत नसल्याने ई-केवायसी पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत.

**१० जुलैपर्यंत ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. ई-केवायसी न झालेल्या व्यक्तिंची यादी प्रत्येक शिधावाटप दुकानदारांना कार्यालयाद्वारे पुरवण्यात आली आहे. गावोगावी दवंडी देऊन तसेच लाभार्थ्यांना रास्त भाव दुकानदाराच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर याबाबत सूचना दिल्या आहेत. ई-केवायसीसंदर्भात १० जुलैपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्यात येईल. अहवालानंतर जे शिधापत्रिकाधारक केवायसी केली नाही त्यांचे धान्य बंद होण्याची दाट शक्यता आहे.** ■ अश्विनी धनवे, पुरवठा अधिकारी, पनवेल



# पडघा परिसरातील वारकऱ्यांना अन्नदानाची सुविधा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. ५ (राजेश दळवी)** भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरातील नागरीकांच्या वतीने आषाढी एकादशी निमीत्त वारीमधुन पंढरपूर येथे जाणाऱ्या वारकऱ्यांना अन्न व चहाचे वाटप करण्यात आल्याने वारकऱ्यांच्यात समाधान व्यक्त होत आहे. पडघा व परिसरातील नागरीकांनी एकत्र येत काही मागील काही वर्षांपासून अन्न शिजविण्यासाठी लागणारे साहित्य, देणगी जमा करुन पंढरपूर येथे पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी अन्नछत्र सुरू केले असुन या वर्षीही पंढरपूर रस्त्यावरील चंद्रमौळी पेट्रोल पंप तोंडले-बोंडले येथे पडघा येथुन वाहनातून विविध साहीत्य नेऊन अन्न शिजवून ३ जुलै रोजी पहाटेपासून दुपारपर्यंत वारीमध्ये पंढरपूर येथे पायी जाणाऱ्या सुमारे १९ हजार वारकऱ्यांना अन्नाचे व ३२ हजार वारकऱ्यांना चहाचे शिस्तबद्ध पद्धतीने वाटप केले. तर दरवर्षी प्रदुषण होऊ नये म्हणून मंडळाकडून प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळी न वापरता नैसर्गिक पानांच्या पत्रावळी वापरल्या जात असल्याने व त्या पुनप्रक्रीयासाठी जात असल्याने स्थानिक प्रशासनातर्फे वारी अन्नछत्र मंडळाचे आभार मानण्यात आले. तसेच वारी अन्न वाटप स्तुत्य उपक्रमाबद्दल वारीमधील अनेक वारकऱ्यांनी अन्नछत्र मंडळाला भेटुन कौतुक केले. तर हा स्तुत्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिधा उपलब्ध करुन देणारे शिधादाते, देणगीदार आणी अहोरात्र मेहनत करणारे शेकडो विविध सेवेकरी, अन्न शिजवणारे आचारी, बस-टेम्पो चालक - मालक, स्थानीक पोलिस, प्रशासन, कर्मचारी आणी अन्नछत्रासाठी जागा उपलब्ध करुन देणारे पंढरपूर रस्त्यावरील चंद्रमौळी पेट्रोल पंपाचे मालक मदनसिंह पताळे यांचे वारी अन्नछत्र मंडळ पडघा व परीसर यांनी आभार मानले

# कल्याण रेल्वे स्थानक स्कायवॉकवर गुन्हेगारांचा वावर

## चाकुचा धाक दाखवून प्रवाशाला लुटले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर शनिवारी सकाळी पाच वाजता उत्तरप्रदेशातील एका प्रवाशाला स्कायवॉकवर झोपलेल्या दोन फिरस्त्यांनी चाकुचा धाक दाखवून 'लुटले. या प्रवाशाच्या खिशातील साडे तीन हजार रूपयांची रोख रक्कम जबरदस्तीने दोन्ही फिरस्तांनी काढून घेतली. ते गर्दुल्ले असावेत असा पोलिसांना संशय आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण रेल्वे स्थानक भागातील स्कायवॉकवर, रेल्वे स्थानक भागात रेल्वे प्रवासी, पादचारी यांना लुटण्याच्या घटना गेल्या दोन ते तीन वर्षात वाढल्या होत्या. रात्री कामावरून परतणाऱ्या महिला, पुरूष प्रवाशांना हे लुटारू लुटत होते. रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर मद्यपी, गर्दुल्ले यांचे अड्डे होते. दिवसभर शहराच्या विविध भागात फिरायचे आणि रात्री आश्रयासाठी कल्याण



रेल्वे स्थानकातील फलाट, स्कायवॉकवर यायचे. असा या गर्दुल्लांचा नित्यक्रम होता.

कल्याण रेल्वे स्थानक भागात गुन्हेगारांचा वाढता वावर आणि रेल्वे स्थानकातही प्रवाशांच्या जीविताला गर्दुल्ले धोका निर्माण करत होते. त्यामुळे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी कल्याण रेल्वे स्थानक भागात विशेष गस्ती पथके तैनात करून या भागातील दिवसा रात्रीची गुन्हेगारी मागील दहा महिन्याच्या काळात मोडून काढली.

रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी रेल्वे स्थानकात सतत गस्त घालून रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर गर्दुल्ले, मद्यपी ठाण मांडणार नाहीत अशी व्यवस्था उभी केली आहे. त्यामुळे कल्याण रेल्वे स्थानक भागातील गुन्हेगारीवर थोडा अंकुश आला आहे. उत्तरप्रदेशात राहणारे मोहम्मद अन्सारी (२७) काही कामानिमित्त कल्याण येथे आले आहेत. कल्याण रेल्वे स्थानक भागात ते शनिवारी पहाटे पाच वाजता परतीच्या प्रवासाठी आले होते. त्यांनी आपल्या जवळील शिल्लक असलेले भोजन फेकून देण्यापेक्षा स्कायवॉकवर झोपलेल्या दोन इसमांना देण्याचा प्रयत्न केला.

# प्रशासकीय राजवटीत नवी मुंबई महापालिकेची उधळपट्टी ?

## माहिती अधिकारातून धक्कादायक खुलासा समोर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेत कोविड काळापासून सुरू असलेल्या प्रशासकीय राजवटीत खर्चात वाढ तर महापालिकेच्या ठेवींमध्ये घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. ठेवीची रक्कम १७५० कोटींवर आली आहे. याच काळात एकूण खर्चात मात्र मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळेच ठेवी कमी झाल्या असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिकेत करोनाकाळापासून लोकप्रतिनिधी नसून पालिकेचा संपूर्ण कारभार प्रशासकाच्या हातात आहे. त्यामुळे करोनाच्या काळापासून आतापर्यंत प्रशासनाने हवी तशी कामे काढल्यानेच खर्चात वाढ होऊन ठेवींमध्ये वाढ झाल्याची चर्चा आहे. पालिकेच्या ठेवी कमी झाल्याची माहिती ही सुधीर दाणी यांना माहिती अधिकारातून सजग नागरिक मंचच्या माध्यमातून पालिकेकडूनच प्राप्त झाली आहे.

**नवी मुंबई महापालिकेच्या गेल्या ५ वर्षांच्या पाहता मागील ३ वर्षांपासून ठेवींमध्ये वाढ झालेली आहे. दरवर्षी पालिकेच्या ठेवींमध्ये २०० कोटींपेक्षा अधिकची वाढ होत आहे. पालिकेने खर्चावर नियंत्रण आणल्यामुळेच ठेवींमध्ये वाढ झाली आहे.**

■ सत्यवान उबाळे,
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
नवी मुंबई महापालिका

# पालघर जिल्ह्यात ४० हजार नवसाक्षर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** केंद्र शासनाच्या उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यात २०२३-२४ दरम्यान १६३९४ तर २०२४-२५ दरम्यान २३ हजार ५७७ नवसाक्षरांची नोंद उल्हास अॅपवर झाली आहे. पुढील दोन महिन्यात होणाऱ्या नवसाक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी करिता नोंदणी सुरू झाली असून आतापर्यंत १३६९ नवसाक्षरांनी नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील नवसाक्षरांनी पुढे येऊन जिल्हा साक्षर करण्याचा शिक्षण विभागाचा मानस आहे.

पालघर जिल्ह्याची १०० टक्के साक्षरतेकडे वाटचाल घडवण्यासाठी नवभारत साक्षरता कार्यक्रमास सर्व शासकीय यंत्रणांनी सक्रीय सहभाग द्यावा याकरिता जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड व मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय नियामक समिती व कार्यकारी समितीची संयुक्त बैठक २ जुलै रोजी पार पडली. शासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सन २०२७ पर्यंत पालघर जिल्हा १०० टक्के साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# वसई-विरारमध्ये मुसळधार पाऊस : जनजीवन विस्कळीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** शनिवार रात्रीपासून वसई-विरार परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून, रविवारी दिवसभर पावसाचा जोर कायम होता. मुसळधार कोसळणाऱ्या या पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांत पाणी साचले, परिणामी जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसून आले.

मुसळधार पावसामुळे नालासोपाऱ्यातील गालानगर, संकेश्वर रोड, आचोळे रोड तसेच वसईतील पापडी, वसई रेल्वे स्थानक परिसर आणि माणिकपूर अशा विविध भागांतील रस्त्यांना अक्षरशः नद्यांचे स्वरूप आले होते. साचलेल्या पाण्यातून वाट काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागली. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वसई-विरार महानगरपालिकेकडून विविध ठिकाणी साचलेले पाणी बाहेर काढण्यासाठी पंपाचा वापर करण्यात आला. दरम्यान, सततच्या पावसामुळे शहरात विजेचा लपंडाव सुरूच होता. काही भागांमध्ये सलग दोन ते तीन तास वीज नसल्याने, तर काही ठिकाणी अधूनमधून वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. रविवारची सुट्टी असल्याने अनेकांनी घरातच राहणे पसंत केले. मात्र, आषाढी एकादशीनिमित्त देवदर्शनासाठी बाहेर पडलेल्या भाविकांना पावसामुळे मोठा त्रास सहन करावा लागला.

दरम्यान, सततच्या पावसामुळे शहरात विजेचा लपंडाव सुरूच होता. काही भागांमध्ये सलग दोन ते तीन तास वीज नसल्याने, तर काही ठिकाणी अधूनमधून वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. रविवारची सुट्टी असल्याने अनेकांनी घरातच राहणे पसंत केले. मात्र, आषाढी एकादशीनिमित्त देवदर्शनासाठी बाहेर पडलेल्या भाविकांना पावसामुळे मोठा त्रास सहन करावा लागला.

# मिरा- भाईदर शिवसेना शाखेत मराठीचे धडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर** - मराठी भाषेवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, अमराठी नागरिकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) शाखेत विशेष उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शाखांमध्ये बाराखडी व इतर भाषाशिक्षणाची पुस्तके ठेवण्यात येणार आहेत. अलीकडेच मराठी भाषा सक्तीप्रकरणी मनसे पदाधिकाऱ्यांनी मिठाई विक्रेत्याला मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे राज्यभरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असून, संबंधित प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यापारी वर्गात असंतोषाचे वातावरण आहे, तर मराठीसाठी कायदा हातात घेतल्याच्या घटनांवर शासनानेही निषेध नोंदवला आहे. परिणामी, मीरा-भाईंदर शहराची प्रतिमा राज्यभरात मलीन होत आहेत



# ज्येष्ठ नागरिकांसाठी उपनगरीय लोकलमध्ये स्वतंत्र डबा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : रेल्वेतील प्रचंड गर्दीत ज्येष्ठ नागरिकांना सुलभ आणि सुरक्षित प्रवासाची सोय व्हावी यासाठी मध्य रेल्वेने अभिनंदनीय पाऊल उचलले आहे. माटुंगा रेल्वे वर्कशॉपच्या तंत्रज्ञांनी विशेष पुढाकार घेत एक मालडबा पूर्णतः ज्येष्ठ नागरिकांसाठी आरक्षित केला असून, त्यातून १५ प्रवाशांच्या अतिरिक्त आसन क्षमतेचा लाभ मिळणार आहे.

६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या नागरिकांसाठी रेल्वेमध्ये स्वतंत्र डबा असावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. त्याची दखल घेत त्यानंतर झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र आसनव्यवस्था पुरवण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिले होते.

या निर्देशानुसार माटुंगा वर्कशॉपच्या कर्मचाऱ्यांनी लोकल ट्रेनच्या सहाव्या डब्याची पुनर्रचना करत, त्याला ज्येष्ठ नागरिकांसाठी समर्पित डब्यात रूपांतर केले आहे. यामुळे चढ-उतार करताना होणाऱ्या अडचणी कमी होणार असून, ज्येष्ठ नागरिकांना सुलभ आणि आरामदायक प्रवास शक्य होणार आहे. मध्य रेल्वेच्या या पायलट प्रोजेक्टला प्रवाशांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, भविष्यात अशा आणखी डब्यांची संख्या वाढवण्याचा रेल्वेचा विचार आहे.

# पलावा पुलाचे उद्घाटन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

## – जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांची मागणी

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**डोंबिवली :** कल्याण शीळ रोडवरील पलावा पुलाचे घाईघाईत उद्घाटन झाले. पूल सुरू होताच काही वाहन चालक घसरून पडले. पुलाचे काम पूर्ण झाले नसताना पूल सुरू केल्याने वाहन चालकांचा अपघात झाला. पुलाचे उद्घाटन करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी केली आहे. तसेच पुलाचे उद्घाटन सत्ताधारी पक्षातील केवळ एक पक्ष करतो, जवळच प्रदेशाध्यक्ष राहतात त्यांनाही बोलावलं नाही. मग महायुती मध्ये युती राहिली कोठे असा टोला म्हात्रे यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला आहे.

कल्याण ग्रामीण मधील कल्याण शीळ रोडवरील देसाई खाडी ते काटई नाका या नवीन उड्डाणपूलाचे शुक्रवारी शिवसेनेचे आमदार राजेश मोरे व काही शिवसैनिकांनी उद्घाटन केले. पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याने काही दुचाकीस्वार घसरून पडले आणि त्यांना दुखापत झाली. यामध्ये एका लहान मुलाचा देखील समावेश आहे. यानंतर पलावा पूल बंद करण्यात आला.

पूल सुरू होताच काही वाहनचालक घसरून पडले. त्यामुळे पूल बंद करावा लागला. पुल सुरू केल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला. यामुळे पुलाचे उद्घाटन करणाऱ्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी केली आहे. या संदर्भात ते सोमवारी पोलिसांची भेट घेणार आहेत. पुलावर मास्टीक अस्फाल्टचा वापर करण्यात आलेला नाही. केवळ डांबराचा स्प्रे फवारण्यात आला आहे. त्याचे पुरावे माझ्याकडे असल्याचा आरोप म्हात्रे यांनी केला आहे.

तसेच उद्घाटनाच्या कार्यक्रमावरून सत्ताधारी पक्षाला टोला लगावताना ते म्हणाले, महायुतीत असताना फक्त एका पक्षाच्या लोकांनी पुलाचे उद्घाटन केले. जवळच सत्ताधारी पक्षातील आमदार जे आता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या पक्षाचा एकही कार्यकर्ता या उद्घाटनाला नव्हता. सत्ताधारी पक्षातील काही पक्षाचे लोक केवळ राजकारण करण्यासाठी हे सगळं करत आहेत. मग यांच्या सत्तेच्या युतीमध्ये काही युती राहिली नाही असे वाटते असा टोला त्यांनी लगावला.

# भिवंडीत समाजवादीची मोर्चेबांधणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ६**

महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवार निवडीसाठी समाजवादी पक्षाची त्रिसदस्यीय समिती बनवण्यात आली आहे. याबाबतची घोषणा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आसिम आजमी यांनी केली आहे. भिवंडी शहरात समाजवादी पक्षाची मोठी ताकद आहे. त्यामुळे महापालिका जिंकण्याच्या दृष्टीने पक्षबांधणी करण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवार निवडीसाठी अकरा सदस्यीय समिती बनवण्यात येणार आहे. या समितीत रईस शेख, प्रदेश उपाध्यक्ष अजय यादव, अरफात शेख यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात मराठीचा सन्मान आहे. प्रत्येक राज्यात येथील मातृभाषेचा सन्मान केला पाहिजे; पण भाषेसाठी गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. महाराष्ट्रात देशभरातून रोजगार व्यवसायासाठी लोक येतात. त्यांना तुम्ही प्रेमाने मराठी शिकवा, अशी प्रतिक्रिया अबू आजमी यांनी दिली आहे.

# भिवंडीतील धामणकर नाका सार्वजनिक गणेशोत्सवाचे भूमिपूजन संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( शरद भसाळे)**

आगामी सार्वजनिक गणेशोत्सवास सुरवात होणार असल्याने भिवंडी शहर परिसरातील गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्तेनी उत्सवा संदर्भात बैठका घेऊन तयारी सुरू केली आहे शहरातील एकात्मतेचा राजा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या 37 व्या सार्वजनिक गणेशोत्सव सोहळा व सजावट कार्याचा शुभारंभ आज सकाळी मंडळाचे संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी व शशिलता शेट्टी यांच्या हस्ते भूमिपूजन करून करण्यात आला. यावेळी भाजपा शहराध्यक्ष रवी सावंत,शिवसेना शहरप्रमुख सुभाष माने,अँड.हर्षल पाटील यांच्यासह मंडळाचे मोहन बल्लेवार,दिलीप पोद्दार,संजय भोईर,हसमुख पटेल,संजय शाह, राजेश शेट्टी,तारु जाधव,संतोष जंम्पाल,ईश्वर पामु,इस्कॉन मंदिराचे सुदाम दास भक्त व मंडळ पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यंदा गणेशोत्सव मंडळाच्यावतीने उत्तरप्रदेश मथुरा येथील वृंदावन चंद्रोदय इस्कॉन मंदिराचा भव्य 150 उंचीचा देखावा सजावटी मध्ये उभारला जाणार असून सजावट देखाव्याचे अनावरण भिवंडी इस्कॉन मंदिरातील सुदाम दास यांच्या हस्ते करण्यात आले.यंदा 37 व वर्ष साजरे केले जात असल्याने यावेळी उपस्थित 37 मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून भूमिपूजन करण्यात आले.शासनाच्या गणेशोत्सव पर्यावरणपूरक करण्याच्या मार्गदर्शक



सूचनांचा आदर राखत यंदासुध्दा गणेशोत्सव देखावा पर्यावरण पूरक साहित्यांचा वापर करून करण्यात येणार असल्याची माहिती संतोष शेट्टी यांनी दिली.यंदा पर्यावरण पुरक मातीची १० फूट उंचीची गणेश मूर्ती हे या वेळच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य असणार आहे असल्याची माहिती शेट्टी यांनी दिली आहे.भूमीपूजन सोहळा यशस्वी

करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी अथक मेहनत घेतली.

# अ‍ॅड. पियांजली महेंद्र पाटील यांच्या नोटरी कार्यालयाचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :: शरद शहाणे**

डोंबिवली पूर्वेला फडके रोड, फतेह अली रोडवरील केबी वीरा शाळेसमोर शाळेसमोरील,111 /Aअलंकार बिल्डिंग पहिला मजला येथे एडवोकेट सौ. प्रियांजली महेंद्र पाटील यांच्या नोटरी कार्यालयाचे उद्घाटन समारंभ घरगुती पद्धतीने संपन्न झाला. आषाढी (देवयानी) ऐकादशीच्या सु सुमुहूर्तावरती हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी वास्तूचे गणेश पूजन करून वास्तुशास्त्रशुद्ध केली.निळजे गावातील रहिवासी श्री वसंत पाटील यांचे कनिष्ठ चिरंजीव महिंद्र पाटील यांच्या सौभाग्यवती प्रियांजली महिंद्र पाटील, मोठा भाऊ वीरेंद्र



पाटील, सर्व नातेवाईक मित्र मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होते भोईर जिमखाना चे सर्वेसर्वा मुकुंद भोईर, माजी नगरसेवक जितेंद्र भोई र अशा अनेक मान्यवरांनी प्रियांजली महेंद्र पाटील यांच्या नोटरी कार्यालयाच्या शुभारंभाला शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या .पाटील कुटुंबाला सरस्वतीचा आशीर्वाद आहे निळजे गावात सर्वोदय विद्यालय, रवींद्रनाथ टागोर न्यू इंग्लिश स्कूल, सुमनताई वसंत पाटील कनिष्ठ विद्यालय, संकल्प व्यवसायीक प्रशिक्षण केंद्र. अशा त्यांच्या शैक्षणिक संस्था कार्यरत आहे.




# विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भिवंडीच्या पंढरीनाथ देवस्थानात गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी ( प्रतिनिधी ) आषाढी एकादशी निमित्ताने भिवंडी शहर व ग्रामीण भागातील श्री.विठ्ठल रखुमाई मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती या निमित्ताने अनेक मंदिरांमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.त्याचबरोबर मंदिराला फुलांनी व विद्युत रोषणाई करून आरास करण्यात आली होती

शहरातील वाणीआळी येथील श्री. पंढरीनाथ देवस्थान मंदिरात आषाढी एकादशी निमित्ताने सकाळी मंदिरातील विठ्ठल रखुमाई मुर्ती ला महाअभिषेक करून आरती करण्यात आली.त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या निमित्ताने मंदिरात आठवडाभर भजन, प्रवचन व किर्तन चा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.एकादशी निमित्ताने मंदिरात विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. हे विठ्ठल रखुमाईचे मंदिर सुमारे ७५ वर्षांपेक्षा जुने आहे.



# ठाणे भाजपचा 'माझे माहेर पंढरी' उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दरवर्षीप्रमाणे राबोडीतील तुळशीरोप वाटप उपक्रम उत्साहात पार पडला. आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने 'माझे माहेर पंढरी' या भक्तिपूर्ण उपक्रमांतर्गत कार्यक्रमात, तुळशी रोप वाटप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात आ.श्री. संजयजी केळकर, भाजपा ठाणे शहर उपाध्यक्ष श्री. विक्रम भोईर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे आयोजन भाजपा राबोडी मंडळ अध्यक्ष सौ. विनया विक्रम भोईर यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धन आणि भक्तिभाव यांचा संगम साधणाऱ्या या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.



# भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आषाढी एकादशी उत्सवात तल्लीन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** हरी ओम रेल्वे प्रवासी भजन मंडळ यांच्या अंतर्गत आषाढी एकादशी सोहळा डोंबिवली स्टेशनवर आयोजित केला होता. गेल्या चौदा वर्षांपासून हा सोहळा होत आहे. आमदार रवींद्र चव्हाण प्रत्येकवर्षी येथे उपस्थित राहून विठ्ठल चरणी नतमस्तक होतात. यावर्षी1 रवींद्र चव्हाण हे भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असतानाही त्यांनी सकाळी सात वाजता येथे येऊन पांडुरंगाचे दर्शन घेतले आणि माझ्या महाराष्ट्रातील जनतेला सुखी ठेव असे विठ्ठलापुढे गाऱ्हाणे घातले.

डोंबिवली रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक एक येथे विठ्ठल मूर्तीची प्राणप्रतिष्ठा भजनी मंडळ तर्फे केली होती. या सोहळयाचा एकमेव उद्देश म्हणजे ज्या विठ्ठल भक्ताला पंढरपूरला जाणे शक्य होत नाही त्यांना विठ्ठलाची पूजा व दर्शन घेता येते. यावर्षी सकाळी विठ्ठलाची यथासांग पूजा करण्यात आल्या नंतर आमदार रवींद्र चव्हाण यांनी विठ्ठलाची पूजा केली. तसेच भजनी मंडळात सहभाग घेऊन त्यांनी स्वतः टाळ वाजवत भजन गात पांडुरंगाचे नामस्मरण केले. हा सोहळा विलोभनीय असा होता. मंडळातर्फे चव्हाण यांचे शाल, पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, डोंबिवली पश्चिम मंडळ अध्यक्ष पवन पाटील, सचिव डॉ. सर्वेश सावंत, यांसह अनेक भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान आमदार रवींद्र चव्हाण म्हणाले, बहुतेक वेळा सोमवार ते शनिवार दरम्यान आषाढी एकादशी येते. पहिल्यांदाच आषाढी एकादशी रविवारी आली आहे. कामावर जाणारा प्रत्येक जण पांडुरंगाच दर्शन घेऊन स्वतः भजनामध्ये सामील होत असतो. आजही ज्यांना पंढरपूरला जाता येत नसतं ते सर्व जण याठिकाणी दर्शन घेतात. मी ही अनेक वर्ष येथे येऊन पांडुरंगाच्या दर्शनाचा व भजनाचा लाभ घेत असतो, आजही घेतला. पांडुरंगाच्या चरणी एव्हढाच साकड घालतो महाराष्ट्राला सर्व संकटापासून दूर ठेव. मला खात्री आहे की पांडुरंग सर्वांना सुखी ठेवेल.



# आषाढीनिमित्त पडघ्यातील शारदा विद्यालयात दिंडी सोहळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :: राजेश दळवी**

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे आषाढी एकादशी वारी निमीत्त शारदा विद्याल य ाच्य ा विद्यार्थ्यांच्या तीने दींडी सोहळा उत्साहात संपन्न झाला.



वारकरी संप्रदायात व नागरीकांच्यात आषाढी पंढरपूर वारीला अनन्य साधारण महत्व असुन संपूर्ण वारकरी संप्रदाय, नागरीक वारीच्या माध्यमातून विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे एकवटला असताना भिंवडी तालुक्यातील शारदा विद्यालयातील विद्यार्थी आणी शिक्षकांनीही मागे न राहता वारीची परंपरा जपत विद्यार्थ्यांनीं लेझीम पथकाच्या तालावर टाळ मृदूंगाच्या गजरात वाजत गाजत सजविलेल्या पालखीतुन ८ वी १० वीच्या विद्यार्थ्यानीं विठुरायाचा दिंडी सोहळा संपुर्ण पडघे गावातुन काढला होता. यावेळी या दींडी सोहळयात पारंपारिक वेशभूषेत डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थ्यीनींसह शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पेणमध्ये आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठल रुक्मिणी पालखी सोहळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :: धनाजी घरत**

दरवर्षी प्रमाणे संत सेवा मंडळ पेण विभाग यांच्या वतीने परम पुज्य सदगुरू अलिबागकर बाबा महाराज, परम पुज्य सदगुरू मारुती बाबा राऊत ( माऊली ) यांच्या कृपाशिर्वादाने व रायगडभुषण प्रज्ञाचक्षु माऊली प्रसाद परम पुज्य सदगुरू ह.भ.प दिगंबर महाराज राऊत माऊली यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली व आदरणीय ह.भ.प शंकर सोनु मानकवळे(आबा ) यांच्या कुशल देखरेखेखाली संपन्न झाला. यावेळी भजन अभंग म्हणत विठ्ठल माऊली पांडुरंगाचा गजर करत तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणत वारकरी भक्तीभावाने तल्लीन झालेले दिसून येत होते. आज आषाढी एकादशीनिमित्त टाळ मृदंगाच्या गजरात रथयात्रा श्री गुरुनिवास संस्थान संत आळी येथून प्रस्थान होऊन महात्मा गांधी मंदिर, पेण नगरपरिषद चौक, हनुमान मंदिर कोळीवाडा, श्री क्षेत्र विठ्ठल रुक्मिनी मंदिर दर्शन ,पंख फाउंडेशन पेण वतीने भव्य दिव्य दिंडीचे स्वागत, बाजारपेठ जैन गल्ली, पेण पोलीस स्टेशन,श्री अंबिका माता दर्शन,श्रीक्षेत्र गोरोबाकाका मंदिर कुंभार आळी, श्रीराम मंदिर प्रभु आळी, श्रीक्षेत्र नंदीमाळ नाका, श्रीक्षेत्र गांगल आळी, श्रीक्षेत्र गणपती दर्शन चावडी नाका, श्रीक्षेत्र गौतमेश्वर मंदिर आणि शेवटी संत सेवा मंडळ पेण कार्यालय येथे आरती व पसायदान प्रसाद वाटप दिंडी समारोप करण्यात आली.

# आषाढी एकादशी निमित्त खवली शाळेत विद्यार्थ्यांची दिंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** आषाढी एकादशी निमित्त सुधागड एज्युकेशन सोसायटीची माध्यमिक शाळा खवली या प्रशालेत दिंडी सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय मोरे एम.व्ही.सर यांनी श्रीफळ वाढवून पालखीचा श्री गणेशा केला .शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वारकरीच्या वेशात टाळं मृदंगाच्या घोषात दिंडी उत्साहाने खवली गावातून साजरी करण्यात आली. यावेळी पालक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य या दिंडीमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. गावकऱ्यांनी ठिकठिकाणी पालखीचे स्वागत केले यावेळी विद्यालयातील कर्मचारी शेखर जोशी यांनी विविध अभंग गाऊन पालखीची रंगत वाढवली तसेच शाळेतील महिला भगिनींनी सुद्धा विविध भजने, भक्ती, गीते अभंग यांचे गायन करून विद्यार्थ्यांबरोबर दिंडीचा आनंद लुटला अतिशय मंगलमय वातावरणात भक्तीरसाचा आनंद लुटत दिंडी सोहळा पार पाडण्यात आला.

"ठाणे जीवनदीप वार्ता" हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI No. MAH/MAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com